## वाचनीय पुस्तकांबद्दल दोन शब्द

बालसाहित्य वय वर्षे ८ ते १२




१) पुस्तकाचे नाव :– **चालल्या बाईसाहेब बसमधून**
लेखक :– वल्लीकानन
चित्रे :– एस. गोपालन
अनुवाद :– सविता जाजोदिया
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. १४/–
पृष्ठसंख्या :– ३२, रंगीत
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

वल्ली अम्माई नावच्या आठ वर्षाच्या चुणचुणीत मुलीच्या पहिल्या बस प्रवासाची ही गोष्ट आहे. छोट्याश्या गावात राहणाऱ्या वल्लीला सगळ्या गोष्टींचं फार अप्रुप असतं – बैलगाड्या, सैनिकांची परेड, फेरीवाले – आणि तिचा सगळ्यात जास्त आश्चर्याचा विषय असतो गावात रोज येणारी बस. एकदा धीर करून परतीच्या प्रवासाचे भाडे जमा करून ती बसमधून पहिला–वहिला प्रवास करते. कंडक्टरबरोबरचा संवाद, बाहेरची दृश्ये सारेच ती जिवाचे रान करून अनुभवते. वाटेत गाडीच्या धक्क्याने मरून पडलेल्या वासराला पाहून दुःखीही होते. मुलांना हे पुस्तक वाचून त्यांच्या बस प्रवासाची नक्की आठवण येईल. पुस्तकाची भाषा आणि जलरंगातली चित्रे सहज सोपी आणि आवडतील अशी.




२) पुस्तकाचे नाव :– **खट्याळ उंदीर**
लेखक :– जॉन यौमेन
चित्रे :– क्वेंटिन ब्लेक
अनुवाद :– शोभा भागवत
प्रकाशक :– कजा कजा मरू प्रकाशन, गरवारे बालभवन, सारसबागेसमोर, पुणे – ४११००२
किंमत :– रू. १०/–
पृष्ठसंख्या :– २४, कृष्णधवल
संकेतस्थळ :– garwarebalbhavanpune.org

उद्योगी आणि दंगेखोर उंदिरांची ही फारच मजेदार गोष्ट आहे. हे उंदीर एका कंजुष गिरणीमालकाला सहज फसवतात आणि एका मांजरीचा जीवही वाचवतात. ती मांजरी मग त्यांची शत्रू न राहता कायमची मित्र बनते. मुलांना उंदरांनी वापरलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना अतिशय आवडतील. क्वेंटिन ब्लेक हया प्रसिदध चित्रकाराची रेखाचित्रे अतिशय गमतीची आहेत.




३) पुस्तकाचे नाव :– **गोष्ट फर्डिनांडची**
लेखक :– मनरो लीफ
चित्रे :– रॉबर्ट लॉसन
अनुवाद :– शोभा भागवत
प्रकाशक :– कजा कजा मरू प्रकाशन, गरवारे बालभवन, सारसबागेसमोर, पुणे – ४११००२
किंमत :– रू. १०/–
पृष्ठसंख्या :– ३६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– garwarebalbhavanpune.org

फर्डिनांड नावाचा एक बैल असतो. त्याला लढाई, भांडणं, मारामाऱ्या आवडत नाहीत. तो शांतताप्रिय असतो. लढाईच्या मैदानात शिपाई त्याच्याशी लढायला भाले, तलवारी घेऊन येतात. पण फर्डिनांड त्यांच्याशी लढाई करत नाही. तो मैदानाच्या मधोमध येऊन स्त्रियांच्या केसात माळलेल्या फुलांचा वास घेत बसतो. शेवटी त्याला घरी परत पाठवून दिलं जातं. १९३९ मध्ये लिहीलेल्या या सुंदर पुस्तकात शांतीचा सखोल संदेश लपलेला आहे.

४) पुस्तकाचे नाव :– **मजेदार गोष्टी**
लेखक :– शशिकांत कदम
चित्रे :– शैला मोहन
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– १०६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




मुलांना प्राण्यांच्या गोष्टी फार आवडतात. ह्या सुटसुटीत पुस्तकात मुलांसाठी १२ सुंदर गोष्टी दिल्या आहेत. त्यात उडायला घाबरणारे हंसाचे पिल्लू आहे, नदीचे पात्र स्वच्छ करणारा हत्ती आहे, अस्वल मित्राला मोराची पिसं भेट देणारी खारूताई आहे, जादूगार कोल्हा आहे आणि चोरी गेलेल्या धान्याची पोती शोधून काढणारा गुप्तहेर कावळाही आहे. कुठल्याही उपदेशाचा आव न आणता योग्य वागणुकीचे धडे देणाऱ्या ह्या रोचक गोष्टी आहेत. आतील रेखाचित्रे अतिशय देखणी आहेत. मुलांना ती रंगवायलाही आवडावीत.

५) पुस्तकाचे नाव :– **मुक्ताची रंगीत पार्टी**
लेखक :– श्रीनिवास पंडीत
चित्रे :– राजू देशपांडे
प्रकाशक :– ऊर्जा प्रकाशन, १५९१, सदाशिव पेठ, सुरम्य अपार्टमेंट, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. १८/–
पृष्ठसंख्या :– १८, कृष्णधवल
संकेतस्थळ :– urjaprakashan.com




मुक्ता आणि तिची लहान बहीण ईशा ह्यांच्या पहिल्या–वहिल्या स्वयंपाकाच्या प्रयत्नाची ही गोष्ट आहे. घरी येणाऱ्या मैत्रिणींसाठी स्वतःच खाणे बनवायचं मुली ठरवतात आणि गडबडीला सुरूवात होते. आईने आधी सर्व तयारी केलेली असतेच, तरीही सर्व मुलींबरोबर पोहे  आणि भेळ बनवताना त्यांची उडालेली तारांबळ आणि ह्या सर्वांसकट केलेली भरपूर मजा ह्याचं विवरण वाचताना मुलांना फार मजा येईल. नेहमीपेक्षा अगदी वेगळ्या विषयावरची ही गोष्ट आहे. देशपांडेंची रेखाचित्रे हे पुस्तकाचं वेगळेपणं ठरावं.

६) पुस्तकाचे नाव :– **ध ध धाडसचा**
लेखक :– लक्ष्मण लोंढे
चित्रे :– जॉन फर्नांडीस
प्रकाशक :– नवनीत प्रकाशन, भवानी शंकर रोड, दादर, पुणे – ४०००२८
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– ५०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– navneet.com




सत्यरंजनदास मुन्शी नावाच्या कलकत्त्याला राहणाऱ्या आजोबांच्या साहसाच्या ह्या अनोख्या कथा आहेत. धाडस म्हटले, की डोळ्यासमोर ४–५ लोकांशी एकटा मारामारी करणारा माणूस डोळ्यासमोर येतो. पण दैनंदिन जिवनातही छोट्या छोट्या साहसाच्या घटना आपण पाहत असतोच. कधी लोकं दुसऱ्यासाठी आपला जीवही धोक्यात घालतात आणि कधी धाडसासाठी कुठलीही मारामारी करावी लागत नाही. या पुस्तकातील कथा या अशा धाडसाच्या आहेत. बर्फात अडकलेल्या माणसाचा जीव वाचवणे असूदे, आदीवासी

लोकांपासून मुलाचा जीव वाचवणे असूदे किंवा रात्री अचानक हल्ला करणाऱ्या वाघाशी मुकाबला करणे असूदे. ह्या गोष्टी मुलांना खऱ्या धाडसाचा आदर्श घालून देतील. पेन्सिलची चित्रेही अप्रतिम.

७) पुस्तकाचे नाव :– **चंदूकाका**
लेखक :– निलीमकुमार खैरे
चित्रे :– बापू उडुपी, गोपाळ नांदूरकर
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– १००, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




आपल्या परीसरातील अद्‌भूत प्राणीसृष्टीची ओळख करून देणारे हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आणि संग्राह्य आहे. खैरेंसारख्या पर्यावरणवाद्याबरोबर दामिनी आणि तिचे मित्र जंगलाच्या सफरीवर निघतात. त्यातून मधमाश्या, मुंग्या, कोळी, मासे, फुलपाखरे, पक्षी, साप, मुंगुस, यांचे विलक्षण जग उलगडत जाते, त्यांचे जगणे समजते. लिखाणाची संवादाची शैली अतिशय रोचक आहे. निसर्गावर, त्यातल्या अफाट विविधतेवर मुलांना प्रेम करायला उद्युक्त करेल असेच हे पुस्तक आहे.

८) पुस्तकाचे नाव :– **शोधांच्या कथा– डी. एन. ए.**
लेखक :– आइझॅक ॲसिमोव्ह
अनुवाद :– सुजाता गोडबोले
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर, नारायण पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– एकाची रू. ३५/–, १८ पुस्तकांच्या संचाची ६३०/–
पृष्ठसंख्या :– ५६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –




ॲसिमोव्ह हे जगातले अग्रगण्य विज्ञान लेखक आहेत. विज्ञानासंबंधी अनंत विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. शोधांच्या कथा ही मालिका शास्त्रिय शोधांची पार्श्वभूमी सांगणारी आहे. आपण ज्या अनेक गोष्टी आजकाल गृहीत धरतो, त्या शोधून काढण्यासाठी संशोधकांनी किती खडतर तपश्चर्या केली, त्या प्रयत्नांच्या अतिशय रंजक कथा या पुस्तकात आहेत. पेशींचा अभ्यास करता करता, न्युक्लीन या नव्या द्रव्याचा शोध लागला. तिथपासून ते पेशींतील गुणसूत्रांचा शोध लागेपर्यंतच्या खडतर प्रवासाची ही रोमांचकरी कहाणी आहे. या शोधांदरम्यान अनेक शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिकांनी गौरविण्यात आले, त्यांच्याही गौरवगाथा अतिशय सोप्या पदधतीने ॲसिमोव्ह यांनी मांडल्या आहते. पुस्तकातील चित्रे अतिशय समर्पक आहेत.

९) पुस्तकाचे नाव :– **विज्ञान खेळण्यांची दुनिया**
लेखक :– अरविंद गुप्ता
चित्रे :– अरविंद देशपांडे
अनुवाद :– उल्हास टुमणे
प्रकाशक :– राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०.
किंमत :– रू. ४५/–
पृष्ठसंख्या :– ४०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– rajhansprakashan.com




शिक्षण आणि त्यातूनही विज्ञान शिक्षण प्रकल्पावर आधरीत असावे हे आता सर्वमान्य झाले आहे. त्यातून हे प्रकल्प खेळणी असतील तर खूपच मजा. विज्ञानावर आधारीत काही सोपी खेळणी बनविण्याच्या कृती ह्या पुस्तकात पहायला मिळतील. ह्या खेळण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ती बनविण्यासाठी वापरलेले साहित्य सहज मिळण्याजोगे, रोजच्या व्यवहारातील आहे. तांब्याच्या वायरची मोटर, तुतीच्या

बीपासून पाणचक्की, प्लॅस्टिकच्या टयूबपासून कारंजे, पत्त्याच्या कार्डापासून चढणारा जोकर, अशी ३५ खेळणी आहेत. डावीकडील पानावर रेखाचित्रे व उजवीकडच्या पानावर सुटसुटीत भाषेत कृती दिलेली आहे.




१०) पुस्तकाचे नाव :– **फास्टर फेणे**
लेखक :– भा. रा. भागवत
प्रकाशक :– उत्कर्ष प्रकाशन, रेणुका अपार्टमेंट्स, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४.
किंमत :– एकाची रू. ४०/–, २० पुस्तकांच्या संचाची रू ८००/–
पृष्ठसंख्या :– ६०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

फास्टर फेणे हा फुरसुंगीचा चॅंपियन सायकलस्वार (खरे नाव बन्या), आणि त्याच्या अफलातून मित्रांच्या ह्या सदाहरीत चातुर्यकथा आहेत. भा.रा. भागवतांची ही अजरामर पुस्तके मुलांना साहसकथांच्या अनोख्या विश्वाची अतिशय रोमांचकारी सफर घडवून आणतात. ट्रींग ट्रींग फास्टर फेणे, विमानचोर विरूद्ध फास्टर फेणे, चिंपान्झी आणि फास्टर फेणे, चक्रीवादळात फास्टर फेणे, गुलमर्गचे गूढ अशा २० पुस्तकांचा हा संच आहे.




११) पुस्तकाचे नाव :– **बैलगाड्या आणि उपग्रह**
लेखक :– मोनिशा बॉब
अनुवाद :– उमाकांत ठोमरे
चित्रे :– आर. के. लक्ष्मण
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए — ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली — ११००१६
किंमत :– रू. १२/–
पृष्ठसंख्या :– ४२, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या भारतातील प्रगतीचा अतिशय सुंदर आढावा सोप्या भाषेत घेणारे हे पुस्तक संग्रही असावे असेच आहे. भारतातील शास्त्रीय संशोधनाची प्रगती ही आपल्या देशाइतकीच प्राचीन आहे. सिंधू नदीच्या खोऱ्यातील मोहांजोदडोतील मानवाच्याही प्रगतीच्या खुणा आहेत. या पुस्तकात घरं व स्थापत्य रचनेपासून ते खगोलशास्त्र, गणित व वैदयक यांच्यातील भारातात झालेल्या विकासाची माहिती आहे. भारतातील शास्त्रज्ञ जगदिशचंद्र बोस व सी.व्हि. रामन यांच्या संशोधनाचीही तपशीलवार माहिती आहे. आतील कृष्णधवल छायाचित्रे व त्याहूनही आर.के.लक्ष्मण यांची अप्रतिम रेखाचित्रे हि या पुस्तकाची मोठी जमेची बाजू ठरावी.




१२) पुस्तकाचे नाव :– **सोनाची सफर**
लेखक :– तारा तिवारी
अनुवाद :– सविता जाजोदिया
चित्रे :– मिकी पटेल
प्रकाशक :– नेहरू बाल पुस्तकालय, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए — ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली — ११००१६
किंमत :– रू. १४/–
पृष्ठसंख्या :– ३६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

सोना नावाच्या उंटाच्या मुलाची ही सुंदर गोष्ट आहे. सोनाला सगळे प्राणी त्याच्या कुबडावरून,लांब पायावरून, त्याच्या सपाट तळव्यावरून आणि लांब मानेवरुन फार चिडवतात. तेव्हां त्याची आई त्याला त्यांच्या शरीराच्या अवयवांचे त्यांच्या वाळवंटातल्या वास्तव्यासाठी असणारे महत्व सांगते. अतिशय हसत–खेळत उंटांच्या शरिरातली अनेक अनुकुलने मुलांना कळतील. शिवाय आपल्याला मिळालेल्या शरिराची लाज न वाटण्याचे बाळकडुही मुलांना मिळेल. पुस्तकातली जलरंगातील चित्रेही मुलांना आवडतील.

१३) पुस्तकाचे नाव :– **शेवग्याच्या शेंगा आणि इतर गोष्टी**




लेखक :– पु. ग. वैदय
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
पृष्ठसंख्या :– ४६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com

विज्ञान कथा मराठी साहित्यात सर्रास पहायला मिळतात पण गणित कथा मात्र अतिशय अभावाने आढळतात. मुलांच्या मनातून गणिताची भिती जाऊन त्याची जागा आनंदाने घ्यावी या हेतूसाठी या पुस्तकातील सात कथा अतिशय उपयुक्त ठराव्यात. न मोजता हिशोब, अंकांची स्थानिय किंमत, अंक भाषेची मजा, नऊ या आकडयाची नवलाई, पत्ते खेळताना आणि जादूच्या प्रयोगातील गणित अशा अनेक विषयातील कथा पुस्तकात आहेत. सर्व गोष्टींमधे गणित अतिशय खुबीने आणि चपखल मिसळले आहे. या प्रकारचे लेखन अतिशय दुर्मिळ आहे आणि म्हणूनच हे पुस्तक संग्राहय आहे.

१४) पुस्तकाचे नाव :– **गोविन्द गुरू**




लेखक :– ज्योतिपुंज
अनुवाद :– निला शर्मा
चित्रे :– रणजित सिन्हां
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. ११/–
पृष्ठसंख्या :– ३६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

बंजारा जमातीतील एक समाजसुधारक गुरूगोविन्द ( १८५८ ते १९८१ ) यांचे हे सहज सोप्या भाषेत लिहलेले हे चरित्र आहे. कुठलेही शालेय शिक्षण झाले नसताना केवळ शिकलेल्यांच्या सहवासाने लिहायला वाचायला शिकलेले, भिल्ल जमातीवरच्या अन्यायाने अस्वस्थ होऊन त्यांच्या लहान आणि तरूण मुलांना साक्षर आणि शहाणे बनवणारे असे गोविन्द गुरू होते. भिल्ल जमातीतील पाटील व कारभाऱ्यांच्या सुरवतीचा रोष पत्करूनही त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. उदयपुरला स्वामी दयानंदांकडे त्यांनी दिक्षा घेतली. त्यांनी भिल्लांमधे देशभक्ती , महिला विकास, पर्यावरणाचे रक्षण अशा अनेक विचारांचे बिज रोवले. इंग्रजांशीही त्यांनी लढा दिला. मुलांच्या नेहमीच्या वाचनात नसलेली एका आगळयावेगळया समाजसुधारकाची ही गोष्ट सोप्या चित्रांनी सजवलेली आहे.

१५) पुस्तकाचे नाव :– **भित्रे भूत**



लेखक :– रत्नाकर मतकरी
चित्रे :– हर्षा शहा आणि स्वाती जोशी
पृष्ठसंख्या :– २४, कृष्णधवल
प्रकाशक :– प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय भारत सरकार पटियाळा हाऊस, नवी दिल्ली– १
किंमत :– रू. १८/–
संकेतस्थळ :– –

रत्नाकर मतकरींच्या ३ मजेदार कथांचा हा संग्रह आहे. भित्रे भूत या पहिल्या कथेत नावाप्रमाणेच घाबरट असणाऱ्या एका भुताबरोबर चित्रा या धिट मुलीने केलेल्या सामन्याची गोष्ट आहे. दुसरी गोष्ट आहे पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या प्राध्यापक नृसिंहनाथ जोगदंड ह्या भूताची. सुधा नावाच्या पुस्तकवेड्या मुलीने वाचनालयातून आणलेली पुस्तके ते भराभर वाचून काढतात. शेवटी तर वाचनालयात लोकांनी उपसून तशीच टाकलेली पुस्तकेही जागच्याजागी लावून ठेवतात. तिसरी गोष्ट आहे टापटीपीची आवड असलेल्या आजीच्या भूताची. थट्टेवारी, ह्या भूतांवर विश्वास नसणाऱ्या प्राध्यापकाला शेवटी आजी सळो की पळो करून सोडते. मुलांना भूतांबद्दल वाटणाऱ्या भीतीचे रूपांतर कुतुहलात आणि मजेत करण्याचे सामर्थ्य मतकरींच्या गोष्टींमधे आहे.

१६) पुस्तकाचे नाव :– **मुकुटमणीचा गुरूमंत्र**




लेखक :– अनंत भावे
चित्रे :– हर्षा शहा आणि स्वाती जोशी
प्रकाशक :– प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार पटियाळा हाऊस, नवी दिल्ली– १
किंमत :– रू. ११/–
पृष्ठसंख्या :– २४, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

अनंत भावे यांच्या ओघवत्या लेखणीतून साकारलेल्या ह्या अद्भूत कथा आहेत. पहिली कथा आहे कुठलेही काम मनापासून आणि आनंदाने केले तर उत्तमच होते हा गुरूमंत्र देणाऱ्या मुकुटमणी ह्या वृद्ध मूर्तिकाराची. दुसरी आहे गौतम बुद्धांनी केलेल्या अहंकारी माकडाच्या गर्वहरणाची. तिसरी आहे जास्वंदी ह्या श्रीमंत मुलीच्या आणि मणी ह्या लोहाराच्या मुलाच्या जादूच्या वाटण्यांमुळे जमलेल्या लग्नाची. शेवटची गोष्ट आहे झिपऱ्या नावाच्या तरतरीत पण अभ्यास न आवडणाऱ्या मुलाची. त्याला अभ्यास कसा आवडू लागला ते ह्या पुस्तकात जरूर वाचावे.
ह्या मालीकेतील इतर पुस्तके जशी डॉ. विजया वाड यांचे फुलवा, श्रीराम शिधये यांचे विदुच्या गोष्टी वगैरेही जरूर मिळवून वाचावीत.

१७) पुस्तकाचे नाव :– **जंगलातील गोष्टी**



लेखक :– गोविंद गोडबोले
चित्रे :– संजय पांडे
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
पृष्ठसंख्या :– १००, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com

मोठ्या सुटसुटीत टाइपात लिहीलेल्या आणि गमतीदार चित्रांनी सजवलेल्या ह्या जंगलातील प्राण्यांच्या ह्या गोष्टी मुलांना नक्की आवडतील. सळसळवनातील वाघाच्या न्यायनिवाड्याची, गूढ गूहेची, अजगराच्या विळख्यातून सोडवणूक करून घेणाऱ्या शूर गिधाडाची, शिशिरवनात राहणाऱ्या किट्टू ह्या लबाड लांडग्याची, धनुष्यविद्येत प्रवीण असणाऱ्या ससूल्याची, करामती कावळयाच्या पिलाची अशा अनेक रंजक गोष्टी आहेत. भाषा अतिशय ओघवती असल्यामूळे मोठयाने वाचायसाठीही या गोष्टी उपयुक्त ठराव्यात.

१८) पुस्तकाचे नाव :– **बेगम गुलाबो मावशी आणि तिचे फुगे**




लेखक :– क्वादसिया झैदी
अनुवाद :– मुकुंद टाकसाळे
चित्रे :– निरेन सेन गुप्ता
प्रकाशक :– नेहरू बाल पुस्तकालय, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. ११/–
पृष्ठसंख्या :– ३४, रंगीत
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

गुलाबो मावशी गावात छोटे खेळण्यांचे आणि घरगुती वस्तूंचे दुकान चालवते. एकदा दुकानात ठेवण्यासाठी बाजारातून वस्तू आणायसाठी गेली असता फुग्यामधून एक बुटका मुलगा तिच्या घरी येतो. त्याची छान सरबराई करून गुलाबो मावशी त्याला कशी सूर्य किरणांच्या त्याच्या गावाला पाठवते त्याची ही गोष्ट. ह्या पुस्तकात मावशीच्या दुकानाचे, बाजाराचे दृष्य अगदी डोळयापुढे उभे राहील असे सुंदर वर्णन आहे. पुस्तकातील रंगीत चित्रेही अप्रतिम.

१९) पुस्तकाचे नाव :– **तानसेनः अद्भूत संगीतकार**



लेखक :– अशोक दावर
चित्रे :– सुनंदा देशपांडे दातार
प्रकाशक :– नेहरू बाल पुस्तकालय, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. १७/–
पृष्ठसंख्या :– २४, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

संगीत क्षेत्रातील ग्वाल्हेर घराण्याचे स्वर्गीय गायक तानसेन यांचे हे मुलांसाठी लिहीलेले चरित्र. सुरूवातीला हरिदासांकडे मग महंमद घोसांकडे झालेले शिक्षण, नंतर रेवाचा राजा रामचंद्र आणि मग सम्राट अशोकाच्या दरबारी संगीतकार म्हणून नेमणूक ह्या सगळयाचे तपशीलवार वर्णन पुस्तकात येते. नंतर येतो ता`महत्वाचा प्रसंग, ज्यात तानसेन दीपक राग गाऊन दिवे प्रज्वलीत करतात व त्यांची गुरूभगिनी रूपा ही मेघ राग गाऊन ज्वाला शांत करते. सगळयांच्या कुतुहलाचा विषय असलेल्या ह्या संगीतकाराची ही गोष्ट मुलांना नक्की आवडेल. तानसेनांच्या जीवनातले सगळे महत्वाचे प्रसंग विस्ताराने दाखवणारी पुस्तकातली रंगीत चित्रे मजकुराला पूरक अशीच आहेत.

२०) पुस्तकाचे नाव :– **शेरू आणि मिठ्ठू**



लेखक :– मनोरमा जफा
अनुवाद :– जगदीश जोशी
चित्रे :– सुषमा सोनक
प्रकाशक :– नेहरू बाल पुस्तकालय, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. १२/–
पृष्ठसंख्या :– ३०, रंगीत
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

मुलांचा पाळीव प्राण्यांचर अतिशय जीव असतो. अशाच एका मिठ्ठू नावच्या मुलाची अणि त्याच्या कुत्र्याची – शेरूची ही गोष्ट आहे. मिठ्ठूला शाळेत सोडून परत येताना शेरूच्या नाकाला गांधीलमाशी चावून चांगलाच ठणका लागतो. हे दुःख तो गाय, मांजर, टपालवाला, अगदी आईलाही सांगायचा प्रयत्न करतो, पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. शेवटी मिठ्ठूच शाळेतून येऊन त्याचे औषधपाणी करतो आणि त्याला प्रेमाने जवळ घेतो. गोष्ट अगदी साधी आहे, पण मुक्या जीवांनाही भावना असतात, आपण त्या समजून घ्यायला हव्यात ह्याची ही गोष्ट जाणीव करून देइल. पुस्तकतली रंगीत चित्रेही समर्पक.

२१) पुस्तकाचे नाव :– **माऊला हवा मित्र**



लेखक :– मनूचेहेर कायमाराम
अनुवाद :– शरद महाबळ
चित्रे :– शिरीन गेझेलबाश
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ३५/–
पृष्ठसंख्या :– २६, रंगीत
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com

निसर्गाने आपल्याला जसे बनविले त्याहून वेगळे बनण्याची धडपड न करता, आहे त्या गुणधर्मांचा स्वीकार करून आनंदाने राहण्याची शिकवण हे पुस्तक देते. मांजराच्या एका बाळाला पक्षांशी मैत्री करायची असते, म्हणून ते परीकडून पंख मागून घेते. माऊ उडायलाही लागते, पण तिला फार अडचणी येतात. मग ती पक्षांशी दोस्ती करायचा नाद सोडून देते आणि वेगळे मित्र शोधायला लागते. शेवटी तिची एका गोड मुलीशी मैत्री होते, आणि ती खूष होते अशी ही छोटीशी गोष्ट आहे. अवघड गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न जरूर करावा,

पण ज्या जमण्यासारख्या नाहीत, त्या ओळखून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करावा अशी शिकवण ही गोष्ट देते. पुस्तकतली चित्रे अगदी वेगळया धाटणीची आहेत. मोठया डोळयांची खेळकर मांजर मुलांना फार आवडेल.

२२) पुस्तकाचे नाव :– **का का कुमारी**
लेखक :– महाश्वेतादेवी
अनुवाद :– स्नेहलता दातार
चित्रे :– कन्यिका केणी
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे — ४११०३०
किंमत :– रू. ३५/–
पृष्ठसंख्या :– २४, रंगीत
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




दहा वर्षांची एक आदिवासी मुलगी, मोयना, सतत प्रश्न विचारत असते. एकदा ती एका मोठया सापाच्या मागे लागते. तिला नुसते हे सांगून चालत नाही, की सापाच्या मागे लागू नकोस. ती लगेच विचारते, "का?" तिला एक फार छान शिक्षीका भेटतात, ज्या तिला मायेने शिकवतात. मोयना मोठी होऊन त्याच गावात शिक्षिका होते. ही गोष्ट मुलांना प्रश्न विचारायला उद्युक्त करेल. पुस्तकातील चित्रे वेगळया धाटणीची, मुलांना अवडतील अशीच आहेत.

२३) पुस्तकाचे नाव :– **पाखरावर प्रेम करणारा पर्वत**
लेखक :– ॲलिस मॅकलॅरन
अनुवाद :– वसुधा आंबिये
चित्रे :– स्टीवन ॲटकीन
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे — ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
पृष्ठसंख्या :– २४, रंगीत
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




ही एक अतिशय सुंदर हृदयस्पर्शी गोष्ट आहे. उजाड वाळवंटात एक उघडाबोडका पर्वत उभा होता. त्याच्या खडकाळ उतारावर एक गवताचे पातेही उगवलेले नसते. एक दिवस एक छोटं पाखरू तिथे येतं आणि तेव्हापासून पर्वताचं जीवन कसं बदलतं त्याची ही गोष्ट आहे. एकाकी पर्वताचं जीवन पाखराच्या आगमनाने आनंदमय कसं झालं त्याची ही गोष्ट मुलांना फार आवडेल. पुस्तकातली स्टीवन ॲटकीन ह्यांची रंगांची उधळण असणारी चित्रे तर केवळ अप्रतिम.

२४) पुस्तकाचे नाव :– **सणांच्या गोष्टी**
लेखक :– माधुरी भिडे
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे — ४११०३०
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– ८६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




भारतीय संस्कृतीमध्ये सणांना महत्वाचं स्थान आहे. या सणांचं महत्व, त्यांची पार्श्वभूमी, त्यामागचा उद्देश, निगडीत लोककथा, दंतकथा यांची मुलांना माहीती व्हावी यासाठी माधुरी भिडे यांनी या गोष्टी लिहील्या आहेत. हिंदू, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन या धर्मातील महत्वाचे सण आणि साजऱ्या करण्याच्या पद्धती यांची सविस्तर माहीती या पुस्तकात रंजक आणि रोचक पद्धतीने देण्यात आली आहे. कुठल्याही शाळेसाठी आणि घरासाठीही हे पुस्तक संग्राह्य ठरावे.

२५) पुस्तकाचे नाव :– **पक्षांच्या गोष्टी**
लेखक :– मिलिंद वाटवे
चित्रकारः– राजेश लवळेकर
पृष्ठसंख्या :– ३२, कृष्णधवल
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. १५/–
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




पावश्या पक्ष्याला पावश्या नाव का पडलं, दयाळ काळा–पांढरा का असतो आणि तो इतका सुंदर का गातो? टिटवी जमीनीवर अंडी का घालते? अशा पक्षांशी निगडीत प्रश्नांची मनोरंजक काल्पनिक उत्तरे गोष्टीरूपाने यापुस्तकात मिळतील. पक्षीनिरीक्षक व अभ्यासक असलेल्या वाटवे यांनी नेहमी दिसणाऱ्या पक्ष्यांच्या जातींची वैशिष्ट्ये गुंफून या काल्पनिक गोष्टी लिहील्या आहेत. त्यामुळे मुलांना त्या त्या पक्षाची वैशिष्ट्ये गोष्टीरूपाने नकळत कळतील.

२६) पुस्तकाचे नाव :– **वाचू आनंदे**
संकलन :– माधुरी पुरंदरे/ नंदीता वागळे
चित्रकारः– संकलन
प्रकाशक :– ज्योत्स्ना प्रकाशन, धवलगिरी, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. २००/–
पृष्ठसंख्या :– १६०, रंगीत, दोन पुस्तकांचा संच
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com




मुलांना चांगलं साहित्य वाचण्याची गोडी लागावी आणि त्याबरोबरच शाळेमधे असलेल्या विविध विषतांचे आकलन सहजसोप्या पद्धतीने व्हावं यादृष्टीकोनातून या पुस्तकांची निर्मिती केली आहे. मुलांच्या अकलनशक्तीनुसार त्यांच्यासाठी दोन पुस्तके या संचात आहेत. या पुस्तकात मराठीतल्या दर्जेदार साहित्याबरोबरच ख्यातनाम चित्रकारांच्या प्रसिद्ध चित्रकृतींचाही अंतर्भाव करण्यात अला आहे. ही पुस्तके त्यामुळेच अतिशय संग्राह्य आहेत.

२७) पुस्तकाचे नाव :– **सुकेशिनी आणि इतर कथा**
लेखक :– सुधा मूर्ती
अनुवादः– लीना सोहोनी
चित्रकारः– संकलन
प्रकाशक :– मेहता प्रकाशन, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन एक्स्चेंजच्या समोर, माडीवाले कॉलनी, पुणे –४११०३०
किंमत :– रू. १३०/–
पृष्ठसंख्या :– १६०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– mehtapublishinghouse.com



एका प्रतिभावान लेखिकेच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेल्या, मनातन घर करून राहणाऱ्या, देश–विदेशच्या गमतीशीर कथा ह्या पुस्तकात आहेत. यातल्या काही कथा भारतीय, काही विदेशी, तर काही सुधा मुर्ती यांनी लिहीलेल्या आहेत. नेहमी लबाडपणा करणाऱ्या कोल्ह्याचं इथे परोपकारी रूप पाहायला मिळेल. आजोबांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी गाय, माकड आणि बुजगावणे आहेत. जादूच्या मदतीने संपत्ती मिळू लागल्यावर लोकांना मदत करणारे आणि तरीही श्रमांवरच भिस्त ठेवणारे तरूणही भेटतील. एका वेगळयाच विश्वाची सफर या गोष्टी घडवून आणतील.

२८) पुस्तकाचे नाव :– **पीपी लॉंगस्टॉकिंग**
लेखक :– ॲस्ट्रीड लिंडग्रीन
अनुवादः– उमाझिमरमन व विमल गोरे
चित्रकारः– संकलन
पृष्ठसंख्या :– १८८, रंगीत, दोन पुस्तकांचा संच
प्रकाशक :– मॅजेस्टिक प्रकाशन, ८, फिनिक्स, ३ रा मजला,
४५७, एस. व्ही. पी. रोड, गिरागाव, मुंबई – ४००००४
किंमत :– रू. ७०/–
संकेतस्थळ :– majesticprakashan.com




पीपी लॉंगस्टॉकिंग या भनाट व्यक्तिमत्त्वाच्या आणि अनेक खटपटी, लटपटी करणाऱ्या मुलीच्या गोष्टींच्या दोन पुस्तकांचा हा संच आहे. लहान चणीची, आई–वडीलांना पारखी झालेली पीपी काय काय थापा मारते, स्वतःच्या अफाट ताकदीची चुणुक कशी दाखवते, कोणालाही ती कशी घाबरत नाही याचे अनेक दाखले या पुस्तकात मिळतात. पीपीच्या ह्या अफलातून गोष्टी वाचताना मुले त्यात गुंगून जातील. पीपी, तिचे दोस्त थॉमस व अनिका, पीपीची बंगली, तिने केलेल्या मारामाऱ्या, चोरांशी केलेला सामना अशा अनेक गोष्टी पुस्तकात आहेत.

२९) पुस्तकाचे नाव :– **का? किती? कसे? कोण?**
लेखक :– डॉ. बाळ फोंडके
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर,
नारायण पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. १२०/–
पृष्ठसंख्या :– १८८, रंगीत, चार पुस्तकांचा संच
संकेतस्थळ :– –




डॉ. फोंडकेंच्या या चार पुस्तकात त्यांनी साध्या सोप्या भाषेत दैनंदिन गोष्टींबाबत मुलांना वाटणारं नैसर्गिक कुतुहल शमवलं आहे. कसं, का, कुठे, किती, केव्हा, काय हे प्रश्न विज्ञान शिक्षणाचे सोबती आहेत. त्यांची साथ घेऊन प्रश्न विचारत राहिलं आणि त्यांची उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला की विज्ञान आपोआप आत्मसात होतं, हाच या पुस्तकाचा संदेश आहे.

३०) पुस्तकाचे नाव :– **ही सूट्टी कशी घालवाल?**
लेखक :– मनोहर चंपानेरकर
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर,
नारायण पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
पृष्ठसंख्या :– १४८
संकेतस्थळ :– –




मनोहर चंपानेरकर ह्यांची गणित विषयावर सुमारे शंभर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. गणितातली कोडी हा त्यांचा आवडता छंद आहे. खास सुट्टीसाठी तयार केलेले हे पुस्तक मनोरंजक व उपयुक्त ठरेल. ह्या पुस्तकात गणितातील कोडी, करामती, चित्रकला, मजेदार वस्तू तयार कारण्याच्या कृती, कात्रणकला यासारख्या मनोरंजक गोष्टींचा समावेश आहे. शाळांसाठी आणि घरांसाठीही हे पुस्तक उपयुक्त ठरावे.

३१) पुस्तकाचे नाव :– **कथा एका साहसाची**
लेखक :– सुनिता नागपूरकर
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर,
नारायण पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ४२/–



पृष्ठसंख्या :– १४८
संकेतस्थळ :– –

मनोहर चंपानेरकर ह्यांची गणित विषयावर सुमारे शंभर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. गणितातली कोडी हा त्यांचा आवडता छंद आहे. खास सुट्टीसाठी तयार केलेले हे पुस्तक मनोरंजक व उपयुक्त ठरेल. ह्या पुस्तकात गणितातील कोडी, करामती, चित्रकला, मजेदार वस्तू तयार कारण्याच्या कृती, कात्रणकला यासारख्या मनोरंजक गोष्टींचा समावेश आहे. शाळांसाठी आणि घरांसाठीही हे पुस्तक उपयुक्त ठरावे.

३२) पुस्तकाचे नाव :– **शोधांच्या कथा– ज्वालामुखी**
लेखक :– आइझॅक ॲसिमोव्ह
अनुवाद :– सुजाता गोडबोले
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर, नारायण पेठ, पुणे – ४११०३०.
किंमत :– एकाची रू. ३५/–, १८ पुस्तकांच्या संचाची ६३०/–
पृष्ठसंख्या :– ५६, कृष्णधवल




संकेतस्थळ :– –

ॲसिमोव्ह हे जगातले अग्रगण्य विज्ञान लेखक आहेत. विज्ञानासंबंधी अनंत विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. शोधांच्या कथा ही मालिका शास्त्रिय शोधांची पार्श्वभूमी सांगणारी आहे. आपण ज्या अनेक गोष्टी आजकाल गृहीत धरतो, त्या शोधून काढण्यासाठी संशोधकांनी किती खडतर तपश्चर्या केली, त्या प्रयत्नांच्या अतिशय रंजक कथा या पुस्तकात आहेत. ज्वालामूखीचा उद्रेक झालेल्याचे विनाशकारी दृश्य आपण दूरदर्शनवर पाहिलेले असते. पृथ्वीच्या पोटातील अविश्वसनिय उष्णता, तिचे थर, इतिहासात झालेले प्रलयंकारी उद्रेक व इतर ग्रहांवरील ज्वालामुखी या सर्वांची शास्त्रीय माहिती ॲसिमोव्ह या पुस्तकात देतात. पुस्तकातील चित्रेही अतिशय समर्पक आहेत.

३३) पुस्तकाचे नाव :– **खेळ खेळूया विज्ञानाचे**
लेखक :– आनंद घैसास, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, शक्ती टॉवर्स, ६७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
पृष्ठसंख्या :– ६४, कृष्णधवल, तीन पुस्तकांचा संच
संकेतस्थळ :– –




खेळ, गोष्टी, कोडी आणि नित्य परिचयाचे दैनंदिन अनुभव यांचा ही पुस्तके म्हणजे खजिनाच आहे. साध्या–सोप्या साधनांनी, शक्यतो घरातल्या घरात मिळतील, अश्या वस्तू वापरून करण्याजोगे अनेक प्रयोग ह्या पुस्तकांमधे आहेत. भाषा अतिशय विनोदी आणि संभाषणाच्या शैलीच्या वापर हे या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे.

३४) पुस्तकाचे नाव :– **विज्ञान रंजन कथा**
लेखक :– विवेक भालेराव
पृष्ठसंख्या :– ५८, कृष्णधवल, दोन पुस्तकांचा संच
प्रकाशक :– पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १७८६ पुणे ४११०३०
किंमत :– रू. ४०/–
संकेतस्थळ :– –

पिरॅमिडचे रहस्य, रस्त्यांनधून वीजनिर्मिती, टॉमी परग्रहावर जातो, मृगजळाच्या शोधात, बंडूची चंद्रावरील मोहीम, अशा अद्भूत विज्ञान कथांचा हा संग्रह आहे. पुढील शतकातील वैज्ञानीक प्रगती व समस्यांचाही वेध भालेरावांनी या कथांमधून घेतला आहे. असे असले तरी या कथा अजिबात रूक्ष न होता, मुलांना एका अनोख्या विश्वात घेऊन जातात. काही कथांमधे खऱ्या ठिकाणांचे संदर्भ आणि वस्तुनिष्ठा एवढी आहे, की गोष्टी अगदी खऱ्या वाटून आपण त्यांत रममाण होतो. उडत्या तबकडीचे गूढ ही कथा त्याचे उत्तम उदाहरण आहे.

३५) पुस्तकाचे नाव :– **A ते Z विज्ञान**



लेखक :– डी. एस. इटोकर
प्रकाशक :– मेहता प्रकाशन, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन एक्स्चेंजच्या समोर, माडीवाले कॉलनी, पुणे –४११०३०
किंमत :– रू. ७२/–
पृष्ठसंख्या :– १००, कृष्णधवल, दोन पुस्तकांचा संच
संकेतस्थळ :– mehtapublishinghouse.com

रोजच्या व्यवहारात विज्ञानावरील अनेक शब्द संज्ञा वापरल्या जातात. शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात विज्ञानावर आधारीत अनेक सिद्धांत व उपकरणे अभ्यासली जातात, परंतु त्यांचे अर्थ माहीत नसतात. त्यासाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त ठरावे. या पुस्तकात इंग्रजी अ या अद्याक्षरापासून ढ पर्यंत जास्तीत जास्त शब्दांची आवश्यक त्या ठिकाणी आकृती काढून समजण्यास सोपी अशी मांडणी केली आहे.

३६) पुस्तकाचे नाव :– **डेनिसच्या गोष्टी**



लेखक :– व्हिक्टर ड्रॅगुन्स्की
चित्रे :– युरी इवानोव
अनुवाद :– श्रीनिवास पंडीत
प्रकाशक :– ऊर्जा प्रकाशन, १५९१, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०
किंमत :– रू. ६०/–
पृष्ठसंख्या :– ८४, कृष्णधवल
संकेतस्थळ :– urjaprakashan.com

डेनिस नावाच्या एका शाळकरी मुलाच्या दैनंदिन जीवनातल्या ह्या गमतीदार गोष्टी आहेत. पुस्तकाच्या सुरूवातीलाच डेनिसला काय आवडतं आणि काय आवडत नाही याची यादी दिली आहे. त्याला लोळायला, पोहायला, आरशासमोर उभे राहून वेडीवाकडी तोंडे करायला आवडते, आणि दातांच्या डॉक्टरांकडे जायला, आईचं मैत्रिणींशी गप्पा मारणं, वगैरे त्याला मुळीच आवडत नाही. पुस्तकाची ही सुरूवात मुलांना आपलसं करते. पुढे मग त्याचा गाण्याचा क्लास, आजारी पडणं, पोहणं, स्वयंपाक करणं असे अनेक प्रसंग तपशीलाने येतात. मुले एकदा का डेनिसला भेटली, की तो त्यांचा कायमचा सख्खा मित्र होऊन जाईल.

३७) पुस्तकाचे नाव :– **मांजरांचा गाव**




लेखक :– शांता शेळके
चित्रे :– जयदीप कडू, ल. म. कडू
प्रकाशक :– गमभन प्रकाशन, ३७९, शनिवार पेठ, पुणे – ४११०११
किंमत :– रू. १०/–
पृष्ठसंख्या :– १६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

ह्या पुस्तकातील कविता शांता शेळकेंच्या आहेत एवढे सांगितले तरी ह्या पुस्तकाच्या दर्जाची कल्पना यावी. ह्या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे, त्या सर्व कविता मांजरी आणि बोक्यांवर आहेत. मांजरांचा गाव, तऱ्हेवाइक, हरवलेले पिल्लू, एक मांजर हिंदुस्तानी, म्हातारा, अशा सरस आणि नेहमीपेक्षा वेगळया कवितांनी हे पुस्तक नटले आहे. बऱ्याचदा मुलांच्या कवितांचे पुस्तक म्हटले, की बडबडगीतेच डोळयासमोर येतात. पण ह्या पुस्तकातील कविता मात्र थोड्या मोठया ८–१२ या वयोगटासाठी अगदी योग्य आहेत.

३८) पुस्तकाचे नाव :– **रविंद्रनाथ टागोरांच्या बाल–कहाण्या**




लेखक :– रविंद्रनाथ टागोर
अनुवाद :– डॉ. अपर्णा झा
प्रकाशक :– प्रकाशन विभाग, महिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
किंमत :– रू. ४५/–
पृष्ठसंख्या :– ९०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

रविंद्रनाथ टागोर विश्वसाहित्यिक होते. कविता, नाटके, कादंबऱ्या, कथा या सारख्या विविध साहित्य प्रकारात त्यांनी लक्षणीय काम केले. या कथासंग्रहात त्यांच्या ११ निवडक गोष्टी एकत्र करण्यात आल्या आहेत. किशोरवयीन मुलांना मनोरंजनाबरोबरच मानवी नितीमूल्यांबद्दलही आस्था निर्मान होइल अशाच निवडक कथा एकत्रित केल्या आहेत. सुट्टी, पोस्टमास्तर व काबुलीवाला ह्यासारख्या लोकप्रिय कथाही ह्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

३९) पुस्तकाचे नाव :– **कागदाची करामत**




लेखक :– माधव खरे
प्रकाशक :– ज्योत्सना प्रकाशन, 'धवलगिरी', ४३०–३१,
शनिवार पेठ, पुणे–४११०३०
किंमत :– रू. ४५/–
पृष्ठसंख्या :– ९०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– jyotsnaprakashan.com

मुलांना खेळणी विकत घेण्यापेक्षा ती बनवण्यासाठी प्रवृत्त केले, तर ती त्यांत जास्त रमतात. त्यांच्या कल्पनाशक्तिला चालना मिळते व त्यांची कार्यकुशलता वाढते. कागदापासून फुलपाखरू, पक्षी, हेलिकॉप्टर, उडणारा मासा, यासारख्या विविध आकर्षक वस्तू बनवणे ही एक मनोरंजक कला आहे. त्यात आनंद तर आहेच, पण त्यात विज्ञानही आहे. सगळी खेळणी फक्त कागदच वापरून केली आहेत. ती बनविण्यासाठी दिलेली माहिती, सूचना, आकृत्या अतिशय तपशलिवार आहेत. हे पुस्तक शाळांमधे कार्यानुभवासाठी आणि विज्ञानासाठी उपयोगी पडेल, तसेच सुट्टीत वेळ मजेत घालवण्यासाठीही.

४०) पुस्तकाचे नाव :– **निवडक किशोर (खंड १ व २)**




लेखक :– संकलन
प्रकाशक :– महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती महामंडळ, प्रभादेवी, मुंबई
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– १३४ पाने प्रत्येकी, रंगीत
संकेतस्थळ :– –

१९७० सालापासून किशोर नावाचे मुलांचे दर्जेदार मासिक निघते. साधाराण १०–१५ या वयोगटातील मुलांना अभिरूचिसंपन्न साहित्याची गोडी लावण्याचे काम किशोरने केले. विविध विषयांचे जगण्याशी असलेले संदर्भ नजरेस आणून दिले.समाजिक, पर्यावरण, विज्ञान, संगणक, कलाविषयक जे सर्जनशील लिखाण प्रसिद्ध झाले, त्यातील अतिशय निवडक लिखाण ह्या २ खंडांच्या रूपात प्रसिद्ध झाले आहे. पहिल्या खंडात निवडक कथा आणि दुसऱ्या खंडात निवडक कविता आहेत. प्रत्येकाच्या संग्रही असावेतच असे हे दोन खंड आहेत.

४१) पुस्तकाचे नाव :– **शोधांच्या कथा– मायक्रोलहरी**




लेखक :– आइझॅक ॲसिमोव्ह
अनुवाद :– सुजाता गोडबोले
प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर, नारायण पेठ,
पुणे – ४११०३०.
किंमत :– एकाची रू. ३५/–, १८ पुस्तकांच्या संचाची ६३०/–

पृष्ठसंख्या :– ५६, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

ॲसिमोव्ह हे जगातले अग्रगण्य विज्ञान लेखक आहेत. विज्ञानासंबंधी अनंत विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. शोधांच्या कथा ही मालिका शास्त्रिय शोधांची पार्श्वभूमी सांगणारी आहे. आपण ज्या अनेक गोष्टी आजकाल गृहीत धरतो, त्या शोधून काढण्यासाठी संशोधकांनी किती खडतर तपश्चर्या केली, त्या प्रयत्नांच्या अतिशय रंजक कथा या पुस्तकात आहेत. प्रकाश लहरींचा बनलेला असतो व त्याच्या लहरीच्या लांबीवरून त्यांचा रंग ठरतो ह्या शोधापासून ते ह्या लहरींचा वापर करून खोल समुद्राच्या तळाशी पाहण्यापासून ते विश्वाची उत्पत्ती कशी झाली असावी हे जाणून घेण्यापर्यंत लहरींच्या उपयोगाचे इत्यंभूत वर्णन ह्या पुस्तकात आहे. पुस्तकातील चित्रेही अतिशय समर्पक आहेत.




४२) पुस्तकाचे नाव :– **मुठेवरचा धोबी – एका पाणपक्षाची निरीक्षणे**
लेखक :– किरण पुरंदरे
चित्रे :– डॉ. अजय हर्डिकर
प्रकाशक :– राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– ११३, कृष्णधवल
संकेतस्थळ :– rajhansprakashan.com

किरण पुरंदरे एक व्यासंगी निसर्गप्रेमी आहेत. झाडं, फुलं, पक्षी, आकाश, डोंगर, नद्या यांचे त्यांनी आस्थेने निरीक्षण केले. आपल्या अवतीभवतीच्या परीसरातल्या निवडक मोजक्या पक्ष्यांची निरीक्षणे त्यांनी या पुस्तकात दिली आहेत. आपल्या पक्षीप्रेमाला त्यांनी अभ्यासाची दिशा दिली. धोबी, टिटवी, वेडा राघू, शिक्रा, पाण कोंबडी अशा पक्ष्यांची नेटाने मिळवलेली त्यांच्या घरट्यांची, लहानसहान सवयींची माहिती अत्यंत अभ्यासू आणि तरीही मनोरंजक, सुबोध शैलीत मांडली आहे. पक्षी निरीक्षण कसे चिकटीने करावे, याचा हे पुस्तक म्हणजे वस्तुपाठच म्हणायला हवा.




४३) पुस्तकाचे नाव :– **अफाट वेगाची पत्रव्यवहार सुविधा – ई–मेल**
लेखक , चित्रे:– विवेक मेहेत्रे
प्रकाशक :– उद्वेली बुक्स, ब–४, रश्मी कॉम्प्लेक्स,
मेंटल हॉस्पिटल रोड, ठाणे (प), ४००६०४
किंमत :– रू. १२०/–
पृष्ठसंख्या :– ११५, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

इंटरनेटची लोकप्रियता वाढण्याचे मोठे कारण म्हणजे ई–मेलची सुविधा. जगाच्या पाठीवर कुठेही असलेल्या मित्रमैत्रिणींना काही सेकंदात संदेश पाठविण्याची ही अद्भूत पद्धत आहे. ई–मेल म्हणजे नेमक काय, स्वतःचं खातं कसं उघडाव, ई–मेल पाठवताना काय खबरदारी घ्यावी वगैरे सगळी माहिती हसत खेळत उदाहरणांसहित आणि उपयुक्त चित्रांसह ह्या पुस्तकात दिली आहे.
अशा प्रकारचे सहावीच्या अभ्यासक्रमावर आधरित कॉम्प्युटर : दोस्त माझा मस्त हे रविंद्र देसाई व सुश्रुत कुलकर्णी हयांनी लिहिलेले राजहंस प्रकाशनाचे पुस्तकही उपयुक्त ठरावे.




४४) पुस्तकाचे नाव :– **कुतुहल (३ भाग)**
कवयित्रीः– श्रुती (पारसकर) करमळकर
चित्रे :– प्रदिप खेतमर
प्रकाशक :– सकाळ पेपर्स लि., ५९५, बुधवार पेठ, पुणे – २.
किंमत :– रू. ६०/–
पृष्ठसंख्या :– १६, रंगीत
संकेतस्थळ :– –

मुलांची जिज्ञासा व अवलोकनशक्ति एखाद्या वैज्ञानिकापेक्षा मुळीच कमी नसते. त्यांच्या जिज्ञासेला खतपाणी घालणे ही आपली जबाबदारी आहे. मुलांना नाटय व कवितेच्या माध्यमातून मिळालेली माहिती आवडते. ह्या पुस्तकात मुलांना सहज समजेल आणि रूचेल अशा पद्धतीने त्यांना पडणाऱ्या काहीं प्रश्नांची खरी आणि वैज्ञानिक आधार असलेली उत्तरे नाटय आणि कविता ही दोन माध्यमे वापरून देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या पुस्तकांचे तीन भाग आहेत –

१. तारंगण (विश्वाच्या जन्माची गोष्ट, चंद्रकला, ग्रहण, धूमकेतू अशा कविता)
२. प्रकाशाची गंमत (बाहुली कुठे दडली, प्रकाशस्त्रोत, सावली, पारदर्शन अशा कविता)
३. वृक्षवल्ली आम्हा सोयरे (सजीव झाडे, फोटोसिंथेसिस, कॅक्टस, झाडे पाने का गाळतात, अशा कविता)

४५) पुस्तकाचे नाव :– **तोत्तोचान**
लेखक :– तेत्सुको कुरोयानागी
अनुवाद :– चेतना सरदेशमुख गोसावी
चित्रे :– चिहिरो इवासाकी
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली – ११००१६
किंमत :– रू. ४५/–
पृष्ठसंख्या :– १३०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in




हे एक विक्रमी खप झालेले लोकप्रिय जपानी पुस्तक आहे. पुस्तकाची सुरुवात होते तेत्सुको ह्या चिमुकल्या मुलीच्या शाळेतून झालेल्या हकालपट्टीने. त्यानंतर तिचा दाखला होतो कोबायाशी या स्नेहशील, कल्पक व द्रष्टया मुख्याध्यापकांनी चालवलेल्या तोमोइ या शाळेत. गणवेश व साचेबद्ध शिक्षणापेक्षा इथे खेळाला, आहाराला, नाटक, संगीत, स्वयंपाकाला, वाचनाला व एकंदरीतच मुलांच्या उत्साही जीवनाला महत्व होते. तेत्सुकोचे आयुष्य या शाळेत फुलले, बहरले. पुढे ती लोकप्रिय जपानी दूरदर्शन कलाकार झाली, व युनिसेफची सद्भावना दूतही झाली. ह्या पुस्तकात तेत्सुकोने तिच्या शाळेच्या अनुभवांचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. मुलं, पालक, शिक्षक ह्या सगळयांना आवडेल असेच हे पुस्तक आहे.

४४) पुस्तकाचे नाव :– **साबणाचे फुगे कसे बनतात?**
लेखक :– सी. व्ही. बॉइस
अनुवाद :– सुधा गोवारीकर
प्रकाशक :– विज्ञान प्रसार, छ–२४, इंस्टिटयूशनल एरिया, नवी दिल्ली
किंमत :– रू. ७०/–
पृष्ठसंख्या :– १२०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– vigyanprasar.gov.in




बॉइस यांचे हे पुस्तक विज्ञान लेखनातील एक अत्यंत श्रेष्ठ पुस्तक आहे. हे १८८९ ते १८९० दरम्यान लंडन इस्टिटयूट येथे तरूण मुलांसाठी त्यांनी दिलेल्या तीन व्याख्यानांचे एकत्रीकरण आहे. वेगवेगळया आकाराचे साबणाचे फुगे कसे बनवता येतील हे दाखवून देतानाच ते अनेक विज्ञानानातील प्रश्नांना हात घालतात. आपला मुद्दा पटवून देण्या करता ते लहान मुलांच्या गीतांपासून ते अगदी बायबलपर्यंत सर्व साहित्यातले दाखले देतात.  जे विज्ञान शिकले नाहीत अशांसकट सर्व वाचकांना हे पुस्तक प्रेरक ठरेल.

४५) पुस्तकाचे नाव :– **स्वामी आणि त्यांचे दोस्त**




लेखक :– आर. के. नारायण
अनुवाद :– अशोक जैन
चित्रे :– मनोभिराम चक्रवर्ती

प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क,
नवी दिल्ली – ११००१६

किंमत :– रू. २५/–
पृष्ठसंख्या :– १७०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

दक्षिण भारतातील मालगुडी या काल्पनिक गावातील पार्श्वभूमिवर स्वामी नावाचा मुलगा आणि त्याचे दोस्त यांचे विश्व नारायणन् यांनी अतिशय जीवंतपणे रेखटले आहे. दहा वर्षाच्या स्वामीचे जीवन त्याच्या शाळेतील शिक्षक, अभ्यास, दोस्तमंडळी, क्रिकेट, आजी आणि तिच्या कहाण्या, परदेशी कपडयांची होळी अशा अनेक माणसांनी आणि घडामोडींनी भरलेले आहे. तरतऱ्हेचे थराराक अनुभव, उपदव्याप आणि धडपडी स्वामीच्या दुनियेला अधिक खुमारी आणतात. मुलांना वाचायला अतिशय आवडेल असेच हे पुस्तक आहे.

४६) पुस्तकाचे नाव :– **कांदे चोर**




लेखक :– राजा मंगळवेढेकर
प्रकाशक :– माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
किंमत :– रू. १८/–
पृष्ठसंख्या :– २७, कृष्णधवल
संकेतस्थळ :– –

पाच अतिशय मोठया समाजप्रवर्तक सत्पुरूषांची चरित्रे अतिशय रसाळ भाषेत सांगणारे हे संग्रही असावेच असेच हे पुस्तक आहे. गावांच्या स्वच्छतेचा वसा घेतलेले आणि त्यासाठी गावोगाव हातात झाडू घेऊन फिरणारे गाडगेमहाराज, स्वातंत्र्यलढयात वल्लभभाई पटेलांच्या कायम बरोबर असणारे, गावाच्या सुधारणेसाठी झटणारे गुजरातचे रविशंकर महाराज, केरळात अस्पृश्यता निवारणाचे काम करणारे नारायण गुरू, इंग्रजांच्या निर्दय जाचाविरूद्ध निर्भिडपणे गुजततमधे लढणारे पंड्याजी, काश्मिरमधे झेलम नदीचे पात्र मोकळे करून पुराच्या संकटातून स्वतःच्या गावाची मुक्तता करणारे सुरस असे हे पाच महापुरूष होत. अतिशय सोप्या शब्दात मुलांना वाचायला आवडतील अश्या शैलीत लिहिलेल्या ह्या सुंदर गोष्टी आहेत.

४७) पुस्तकाचे नाव :– **तेरा अपूर्व किशोर कथा**




अनुवाद :– सुमती सरान
चित्रे :– मिकी पटेल
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए – ५ ग्रीन पार्क,

नवी दिल्ली – ११००१६

किंमत :– रू. ५०/–
पृष्ठसंख्या :– ८०, कृष्णधवल
संकेतस्थळ :– nbtindia.org.in

आसामी (अनंत देव शर्मा), बंगाली (सतजित राय), इंग्रजी (रस्किन बाँड), गुजराती (पन्नालाल पटेल), हिंदी (भीष्म साहनी), कन्नड (त्रिवेणी),मल्याळम् (करून पिल्ले), मराठी (भा.रा. भागवत), उडीया (एस.के. आचार्य), पंजाबी (गुरूबक्ष सिंग), तामिळ (सुंदरा रामस्वामी), तेलुगु (रंधी सोमराजू) आणि उर्दु (सिराज अन्वर) या भाषांमधील नावाप्रमाणेच अपूर्व कथांचे हे संग्रही असावेच असे पुस्तक आहे. लेखकांच्या नावावरूनच पुस्तकाच्या दर्जाची कल्पना यावी.

४८) पुस्तकाचे नाव :– **दिनदर्शिकेमधील जादू**




लेखक :– पी. के. श्रीनिवासन

अनुवाद :– डॉ. मधुकर देशपांडे

प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर, नारायण पेठ, पुणे – ४११०३०

किंमत :– रू. ६०/–

पृष्ठसंख्या :– ५६, कृष्णधवल

संकेतस्थळ :– –

दिनदर्शिका आपण रोजच पाहतो. एरवी भिंतीवर निमूटपणे लटकून असणारे कॅलेंडर म्हणजे माहितीचा खजिनाच असतो. दिनदर्शिका वापरून खेळता येणारे गणिताचे खेळ दाखवणारे, नवी कोडी आणि नव्या जादूंची ओळख करून देणारे हे मजेदार आणि उपयुक्त पुस्तक आहे. दिनदर्शिका वापरून झटपट बेरिज आणि सरासरी कशी काढावी, अंक सारिण्यांमधली जादू, स्तंभीय बेरजेचा खेळ तसेच एका कागदाच्या कपट्यावर २०० वर्षांची दिनदर्शिका कशी बनवावी अश्या गमती–जमती या पुस्तकात आहेत.

४९) पुस्तकाचे नाव :– **शोधांच्या कथा– प्लूटो**




लेखक :– आइझॅक ॲसिमोव्ह

अनुवाद :– सुजाता गोडबोले

प्रकाशक :– मनोविकास प्रकाशन, ३ अ, शक्ती टॉवर, नारायण पेठ, पुणे – ४११०३०

किंमत :– एकाची रू. ३५/–

पृष्ठसंख्या :– ५६, कृष्णधवल

संकेतस्थळ :– –

ॲसिमोव्ह हे जगातले अग्रगण्य विज्ञान लेखक आहेत. विज्ञानासंबंधी अनंत विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. शोधांच्या कथा ही मालिका शास्त्रिय शोधांची पार्श्वभूमी सांगणारी आहे. आपण ज्या अनेक गोष्टी आजकाल गृहीत धरतो, त्या शोधून काढण्यासाठी संशोधकांनी किती खडतर तपश्चर्या केली, त्या प्रयत्नांच्या अतिशय रंजक कथा या पुस्तकात आहेत. युरेनस व नेप्च्युनच्या शोधानंतर आणखी एक ग्रह बाहेरच्या कक्षेत असावा अशी शक्यता खगोलशास्त्रज्ञांना वाटत होती. अतिशय गुंतागुंतीच्या गणिताने त्याची जागा वर्तवण्यापासून ते अब्जावधी ताऱ्यांच्या समूहातून त्याचे निरिक्षण करण्यापर्यंतच्या प्रवासाचे शास्त्रशुदध वर्णन ॲसिमोव्ह ह्यांनी पुस्तकात केले आहे. पुस्तकातील चित्रेही अतिशय समर्पक आहेत.

५०) पुस्तकाचे नाव :– **झाड लावणारा माणूस**




लेखक :– जॉं जिओनो

अनुवाद :– माधुरी पुरंदरे

चित्रे :– माधुरी पुरंदरे

प्रकाशक :– राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

किंमत :– रू. २५/–

पृष्ठसंख्या :– ३४, कृष्णधवल

संकेतस्थळ :– rajhansprakashan.com

जॉं जिओनो यांच्या ह्या कथेने जगभरातल्या लहान–मोठ्या वाचकांवर मोहिनी घातली आहे. एखाद्या माणसाच्या व्यक्तिमत्वामधले खरोखरीचे असामान्य गुण स्पष्ट दिसायला हवे असतील तर अनेक वर्षे त्या व्यक्तीच्या कामाचे निरीक्षण करावं लागतं. कुठल्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता निरपेक्षपणे पानाफुलांवर, पशुपक्ष्यांवर, जमिनीवर आणि आकाशावर अबोल प्रेम करणाऱ्या एका विलक्षण माणसाची ही गोष्ट आहे.

५१) पुस्तकाचे नाव :– **नदी बोलली त्या दिवशी**




लेखक :– कमला नायर
अनुवाद :– सविता जजोदिया
चित्रे :– शंकर सेन
प्रकाशक :– नॅशनल बुक ट्रस्ट
किंमत :– रू. १४/–
पृष्ठसंख्या :– ३६, दोन रंगी
संकेतस्थळ :–

जानू नावाची एक मुलगी खेड्यात राहत असते. मुलगी असल्याने तिला सर्व घरची कामे करायला लागत. तिचे भाऊ शाळेत जात पण शिकायची प्रचंड इच्छा असूनही जानूला शाळेत जायची परवानगी नव्हती. एके दिवशी उदासपणे नदीकाठी बसली असताना अचानक नदी बोलू लागते आणि तिला शाळेत जायला प्रोत्साहन देते. नंतर दयाळू शिक्षकांच्या सहाय्याने जानू कशी शाळेत जायला लागते, त्याची ही हृदयस्पर्शी गोष्ट आहे. पुस्तकतली दोनरंगी चित्रे अतिशय सुंदर.